
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 8 | MAY - 2023

# "मा. यशवंतराव चव्हाण यांचे शेती विषयक योगदान"

**सौ. सीमा विजय कारंडे**
**एम.ए.बी.एड.**
**सहाय्यक शिक्षिका, सांताक्रूझ (पूर्व) म.न.पा.माध्यमिक शाळा, मुंबई.**

**प्रस्तावना :-**



आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ज्यांच्या सार्थ गौरव केला जातो ते संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण हे सर्वार्थाने लोकनेते होते. समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, समाजसुधारक, उत्तम वक्ता, कुशल प्रशासक, साहित्यिक अशा विविध पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्व समृध्द होते. शेती, सहकार, उद्योग, शिक्षण, तंत्रज्ञान, कला अशा जीवनाच्या विविध क्षेत्रावर त्यांच्या व्यक्तिमत्वाची, विचारांची छाप पडलेली दिसून येते. शेती हा महाराष्ट्रातील जनतेचा मुख्य व्यवसाय असल्याने शेतीच्या विकासाकडे त्यांनी प्रामुख्याने लक्ष दिले. प्रस्तुत शोधनिबंधात मा. यशवंतराव चव्हाण यांचे शेतीसुधारणा विषयक योगदानावर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

यशवंतरावांचा जन्म एक शेतकरी कुटूंबात झाला असल्याने त्यांना शेती व शेतकरी यांच्या बिकट परिस्थितीची चांगलीच जाणीव होती. त्यांचे शेतीविषयक विचार वास्तववादी होते. म्हणूनच गोहत्या बदी विधेयकाचा विरोध करताना यशवंतरावांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक दृष्टीकोनातून गोहत्या बंदी कशी तोट्याची आहे हे विधीमंडळातील भाषणात दि. २ एप्रिल १९५३ रोजी सांगितले आहे.[३] यशवंतरावांनी आपल्या कारकिर्दीत शेतीच्या विकासासाठी व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणीही केली. यशवंतरावांनी महाराष्ट्रात पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ करुन शेतीच्या विकासास प्राधान्य दिले. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या काळात त्यांनी 'कूळ कायदा करुन कसेल त्याची जमीन' हे तत्व अंमलात आणले.

**पूर्वचरित्र :-**

मा. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म दि.१२ मार्च १९१३ रोजी सौ. विठाबाई आणि श्री.बळवंतराव या दांपत्याच्या पोटी 'देवराष्ट्रे' या गावी झाला. सन १९१७ साली प्लेगच्या साथीमध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यावेळी यशवंतरावांचे वय अवघे ४ वर्षांचे होते.[१] त्यानंतर आईबरोबर त्यांनी आपल्या बालपणीचे थोडे दिवस देवराष्ट्रे गावी काढले. तेथेच त्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. त्यानंतरचे यशवंतरावांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कराडमध्ये झाले. सन १९३८ मध्ये इतिहास व राज्यशास्त्र विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची पदवी आणि सन १९४१ मध्ये पुण्याच्या लॉ कॉलेज मधून कायद्याची पदवी (एल.एल.बी.) संपादन केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दि.२ जून १९४२ मध्ये फलटण येथील कै. रघुनाथराव मोरे यांच्या वेणूताई या कन्येशी ते विवाहबद्ध झाले.

तत्कालीन केंद्रीय अन्नमंत्री किडवाई यांनी महाराष्ट्रातील दुष्काळी भागाचा लवकरात लवकर दौरा करावा म्हणून यशवंतरावांनी सतत पाठपुरावा केला. शेवटी दि.१९ जानेवारी १९५३ रोजी हैद्राबाद येथील काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीनंतर श्री. किडवाई यांनी दुष्काळी भागाचा दौरा करण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार दि. २० जानेवारीस यशवंतराव अन्नमंत्री किडवाईसह दुष्काळी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले. दौऱ्याच्या नोंदीमध्ये यशवंतराव लिहितात की, या दौऱ्यावेळी ते किडवाईसह निंबर्गी गावी गेले. तेथे शेतकी

खात्यातील श्री. शितोळे यांनी येथे बरीच वर्षे चालू केलेले नाला बंडिंगच्या कामाचे परिणाम दाखविण्यासाठी हजर होते. छोटा ओढा अडवून 'नाला बंडिंग' केले होते.त्यामुळे 'सबसॉईल वॉटर' जमिनीच्या पोटातील पाण्याचा जिव्हाळा कमी खोलीवरच लागला हा सर्वात मोठा फायदा दिसला. सहा ते आठ फुटावर खोलीत इंजिन चाललेले दिसले. चार मोठे पाण्याचे झरे दिसले. एका खडकावर विहिरीवर वीस एकरावर पुढे ऊसाचे पीक भिजत असल्याचे पाहिले. छोटे बंधारे, बंदिस्त आणि नालाबंडिंग हे दुष्काळी भागावरचे कायमचे उपाय आहेत असा माझा विश्वास होता तो खऱ्या अर्थाने द्विगुणित झाला.[१२] थोडक्यात यशवंतरावांचा दुष्काळ निवारणाबाबत छोटे बंधारे व नालाबंडिग हा कायमस्वरुपी उपाय होता.

**यशवंतरावांचे शेतीविषयक कार्य :-**

कष्टकरी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. पारंपारिक शेतीऐवजी बाजारातील गरज पाहून शेतकऱ्यांनी पीके घेतली पाहिजेत असे त्यांचे मत होते. कोणताही शेतकरी धंदा म्हणून शेती करत नाही. त्यामुळे शेतीतून त्याला मोठा फायदा होत नाही. म्हणून ज्याप्रमाणे एखादा धंदा करणारा मनुष्य धंद्यात मिळणाऱ्या आर्थिक फायद्यासाठी धंदा करीत असतो त्याप्रमाणे शेतीकडे पाहिले पाहिजे. तसेच ऊसाचा शेतकरी हा साखरेचा व्यापारी किंवा कारखानदार बनला पाहिजे,

भुईमूग पिकविणारा शेतकरी तेलाचा व्यापारी किंवा कारखानदार बनला पाहिजे. तरच कच्च्या मालाचा पक्का माल तयार होत असताना येणारी व्यापारी वृत्ती आणि तिच्यातून निर्माण होणारी पिळवणूक याला पायबंद बसेल.[५] असे त्यांचे मत होते. शेतीच्या विकासासाठी शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. म्हणूनच महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने स्थापन करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. त्यांच्या काळात महाराष्ट्रात १८ सहकारी साखर कारखाने सुरु झाले. फक्त साखर कारखानेच नव्हे तर शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते व कर्ज पुरवठा सुलभ रितीने व्हावा म्हणूनही त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी सहकारी सोसायट्या, सहकारी व भूविकास बँकांची स्थापना केली. याशिवाय पशूपालन, दुग्ध व्यवसाय, शेतमाल खरेदी-विक्री संघ या शेतकऱ्यांच्या फायद्याच्या बाबींकडेही त्यांनी लक्ष दिले. शेतीचे बागायत क्षेत्र वाढावे म्हणून पाटबंधारे, धरणांची निर्मिती, वीज निर्मिती अशा कामांची यशवंतरावांनी बांधणी केली. महाराष्ट्राची सिंचन क्षमता तपासून ती कशाप्रकारे वाढविता येईल यासाठी विडनांचे अभ्यासगट नेमले. महाराष्ट्राचे भाग्य उजळून टाकणाऱ्या 'कोयना प्रकल्पाची' सुरुवात दि.१ मार्च १९५८ रोजी यशवंतरावांच्या हस्तेच झाली. तसेच मराठवाड्याचा कायापालट घडविणाऱ्या 'पूर्णा प्रकल्पाचाही' प्रारंभ त्यांच्याच हस्ते झाला. शिवाय विदर्भातील 'पारस थर्मल पॉवर स्टेशन' हा भव्य प्रकल्पही त्यांच्याच कारकिर्दीत पूर्ण झाला.[६] तसेच राज्यातील कृषी विद्यापीठांच्या स्थापनेतही त्यांचा संकल्पनात्मक सहभाग होता.[७] अशाप्रकारे यशवंतरावांनी शेती व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी खूप प्रयत्न केले.

**यशवंतरावांचे दुष्काळ निवारणाचे कार्य :-**

भौगोलिक विविधतेमुळे महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण सर्वत्र सारखे नाही. कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो तर सह्याद्रीच्या पूर्वेस असणाऱ्या पर्जन्य छायेखालील प्रदेशात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात वारंवार दुष्काळ पडतो. दुष्काळी जनतेबद्दल यशवंतरावांना खूप तळमळ होती. सन १९५२-५३ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. अन्नधान्यांची टंचाई होती. त्या काळात रेशनिंगच्या अपुऱ्या धान्य पुरवठयामुळे लोकांचे खूप हाल होत होते. यशवंतरावांचे निरनिराळया भागातील कार्यकर्ते त्यांना तारा पाठवून, फोन करुन धान्य पुरवठ्याची मागणी करीत होते. यशवंतरावांना दुष्काळी जनतेबद्दल किती उत्कट सहानुभूती होती हे त्यांच्या दि.१ जानेवारी १९५३ च्या नोंदीवरुन दिसून येते. ते कर्जत भागात दुष्काळी कामे पाहण्यासाठी गेले असता घोगरगावी दुष्काळी परिस्थितीतही 'आमच्या गावी दूध-कॉफी घेऊन जा' असा लोकांचा आग्रह पाहून माझे मन गहिवरले असे ते लिहितात.[८]

१९५३ साली दुष्काळी भागातून यशवंतरावांना अन्नधान्य पुरवठा करण्याविषयी सतत मागण्या येत होत्या. त्यावेळी केंद्रीय अन्नमंत्री रफी अहमद किडवाई हे होते. त्यांच्याकडे यशवंतरावांनी महाराष्ट्रातील दुष्काळी जनतेला स्वस्त दरात धान्य पुरविण्याची विनंती केली. मात्र किडवाईंनी दुष्काळी भागाचा दौरा केल्यानंतर अन्नधान्य पुरवठा करण्याविषयी विचार करु असे कळविले. मात्र तोपर्यंत लोकांची उपासमार वाढणार होती. त्यातच केंद्राकडून आर्थिक मदत मिळण्यामध्ये केंद्रीय अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनी अडसर घातला. अशा परिस्थितीत यशवंतरावांनी अन्नमंत्री किडवाई यांची भेट घ्यावयाचे ठरविले. दि.८ जानेवारी १९५३ रोजी दिल्लीला अन्न परिषद होणार होती. या परिषदेला हजर राहण्यासाठी यशवंतराव दिल्लीला आले. मात्र त्यावेळी अन्नमंत्री किडवाई यांची प्रकृती बरी नसल्याने ते परिषदेला हजर राहणार नव्हते. तेंव्हा यशवंतरावांनी किडवाई यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली व महाराट्रातील दुष्काळी जनतेसाठी आवश्यक गहू स्वस्त दरात देण्याचे आश्वासन किडवाईंकडून मिळविले.[९] किडवाई यांच्याकडून आश्वासन घेऊन ते गप्प बसले नाहीत. दि.८ जानेवारीच्या अन्न परिषदेला ते हजर राहिले. पुढे दि.१० जानेवारी १९५३ रोजी मुंबईत काँग्रेस हाऊसमध्ये झालेल्या दुष्काळ निवारण समितीच्या सभेतही ते हजर राहिले. दुसऱ्या दिवशी कॅबिनेट मिटींगनंतर त्यांनी कलेक्टरांच्या दुष्काळ परिषदेला हजेरी लावून मार्गदर्शन केले.[१०]

दुष्काळी भागासाठी मिळणाऱ्या स्वस्त गव्हाच्या मदतीसंबंधी केंद्रीय अर्थमंत्री श्री.चिंतामणराव देशमुख यांनी काही अडचणी निर्माण केल्या. तेंव्हा यशवंतरावांनी त्यांचाही समाचार घेतला. दुष्काळ निवारण्यासाठी श्री. देशमुख यांनी पुण्यात मुंबई सरकारने दुष्काळी भागास परिणामकारक मदत करण्यासाठी दारुबंदीचा फेरविचार करावा, रस्ते व शिक्षणावरील खर्च कमी करावा अशा उपाययोजना सांगितल्या. या सर्वांचा समाचार घेताना यशवंतरावांनी म्हटले आहे की, राष्ट्रीय नियोजनाचा विचार कारणारांनी दुष्काळी दुःखांशी शेकडो वर्षे बांधलेल्या विभागासाठी काही विशेष व स्वतंत्र विचार का करु नये? फक्त १५ कोटी रुपये या प्रश्नासाठी पाच वर्षांकरिता ठेवले आहेत म्हणे! उलट भारतातील सुपीक प्रदेशातून शेकडो कोटींच्या खर्चाळू योजना वर्षानुवर्षे चालू राहणार आणि हे आमचे महाराष्ट्रीय अर्थमंत्री उंटावरुन आम्हाला उपदेश करणार की दुष्काळ ही राज्यांची जबाबदारी आहे आणि त्यांच्यासाठी शिक्षण उपाशी राहू द्या! बहुजन समाज आताशी कोठे डोळे किलकिले करुन इकडे तिकडे पाहू लागला आहे तोच हे विद्वान आम्हाला सांगणार की 'पोट उपाशी नको असेल तर डोके उपाशी ठेवा आणि डोके उपाशी ठेवायचे नसेल तर राहूद्यात पोट उपाशी' वारे अर्थमंत्री.[११]

## लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि पंचायत पद्धती

अनेक जणांचं असं मत आहे की ही महाराष्ट्राला यशवतंरावांनी दिलेली अमूल्य देणगी आहे आणि त्यामुळं महाराष्ट्रानं देशातल्या इतर राज्यांनाही रस्ता दाखवला. भारत स्वतंत्र झाल्यावर सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी सगळेच आग्रही होते. ब्रिटिशांच्या काळात प्रांतांची निवडून आलेली सरकारं होतीच. त्याखाली लोकल बोर्ड होते.

पण खेडं हे केंद्रस्थान मानून गावागावापर्यंत लोकशाही नेण्यासाठी, स्थानिक पातळीवरही निर्णयाचे अधिकार देण्यासाठी पंचायत पद्धती आणण्यावर पंडित नेहरुंचा भर होता. बलवंतराय मेहता समितीनं त्यासाठी केलेल्या शिफारसींनुसार काही राज्यांनी ती प्रत्यक्षातही आणली.पण यशवंतराव चव्हाणांना त्यात काही त्रुटी जाणवत होत्या. त्यानुसार महाराष्ट्रानं स्वतंत्र अभ्यास केला, त्यासाठी वसंतराव नाईकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. यशवतंरावांच्या स्वतःच्या सूचना आणि आग्रह होते. त्यानुसार आठ महिन्यांनी महाराष्ट्रानं स्वतःचं पंचायत राज्य विधेयक आणलं.

८ डिसेंबर १९६१ रोजी ते विधिमंडळानं संमत केलं आणि १ मे १९६२ पासून ते अंमलात आणलं गेलं. यानुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आली. महाराष्ट्रामध्ये ही व्यवस्था अन्य कोणत्याही राज्यापेक्षा जास्त यशस्वी ठरली. १९५२-५६ या काळात यशवंतराव स्थानिक स्वराज्य संस्था विभागाचे मंत्री होते. या काळातला त्यांचा अनुभव महाराष्ट्राला उत्तम पंचायत राज्य व्यवस्था देण्यात झाला असं म्हटलं जातं. या पद्धतीमुळं दोन गोष्टी प्रामुख्यानं झाल्या.

एक म्हणजे सत्ता केवळ केंद्र वा राज्यातल्या नेतृत्वाच्या हाती न केंद्रीत होता, ती गावपातळीपर्यंत विभागली गेली. निर्णय घेण्याचे अधिकार आणि ते प्रत्यक्षात आणण्याची प्रशासकीय व्यवस्था गावांपर्यंत तयार झाली. त्याची स्वायत्तता हीसुद्धा एक देणगी होती आणि असं म्हटलं गेलं की अनेक आमदार, खासदारांचा त्याला तेव्हा विरोध होता कारण त्यांचं काहीच चालणार नव्हतं. पण यशवंतरावांनी ती प्रसंगी वाईटपणा पत्करुन प्रत्यक्षात आणलं.

यशवंतरावांचे त्या काळातलं काम जवळून पाहिलेले ज्येष्ठ पत्रकार अरुण साधू, 'लोकसत्ते'च्या २०१० सालच्या दिवाळी अंकातल्या यशवंतरावांवरच्या त्यांच्या लेखात लिहितात, 'विधेयकातील काही तरतुदींवर केंद्रातील काही लोक आणि राज्यातील आमदार, खासदार नेतेमंडळी नाराज होती. कारण त्यांना जिल्हा परिषदांच्या कामात हस्तक्षेप करायला वाव ठेवण्यात आला नव्हता. चव्हाणांनी मात्र मोठ्या चातुर्यानं विधेयक संमत करुन घेतलं. १२ एप्रिल १९६१ रोजी नाईक समिती अहवाल जेव्हा विचारासाठी विधिमंडळात आला त्यावेळी चव्हाणांनी केलेलं भाषण त्यांच्या विचारपूर्वक संसदीय वक्तृत्वाचा एक नमुना तर आहेच, पण त्याचप्रमाणे लोकशाहीतील प्रशासनाच्या प्रक्रिया, निर्वाचित सत्ताधा-यांचे अधिकार आणि पंचायत राज्याच्या संकल्पनेचा लोकशाहीच्या चौकटीत बसणारा भावार्थ याबद्दलचा त्यांचा अभ्यास आणि गाढ समज या भाषणातून प्रतीत होते. खासदार आणि आमदारांना जिल्हा प्रशासनावर कोणतेही स्थान असू नये हा विधेयकातील वादाचा मुद्दाही मंजूर झाला.'

यासोबतच या रचनेनं महाराष्ट्राला मोठी देणगी दिली म्हणजे स्थानिक नेतृत्वाचा उदय. केवळ उच्चवर्गीय वा धनाढ्य वा राजकारणात स्थिरावलेल्या कुटुंबांनाच नेतृत्व करता येईल असा समज आणि रचना या नव्या पद्धतीनं मोडून काढली. गावपातळीवरुन पंचायत पद्धतीत नेतृत्व पुढं येऊ लागलं. ती एक संसदीय पद्धतीची शाळाच बनली. त्या प्रक्रियेतून मोठं झालेल्यांनी पुढे महाराष्ट्राचं नेतृत्व केलं. आजही महाराष्ट्रातले मंत्री वा आमदार यांची सुरुवात ग्रामपंचायत सदस्य या टप्प्यापासून झालेली असते.

## कृषी आणि औद्योगिक धोरण

कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र कायम देशातल्या आघाडाच्या राज्यांमध्ये गणला जातो. काळाच्या ओघात पारंपारिक कृषिपद्धतीची जागा आधुनिक शेतीनं घेतली आणि राज्य कृषिप्रधान अर्थव्यवस्थेकडून उद्योगाधारित अर्थव्यवस्थेकडे गेलं.पन्नास टक्क्यांपेक्षाही अधिक औद्योगिकीकरण आणि शहरीकरण झालेल्या देशातल्या निवडक राज्यांपैकी एक महाराष्ट्र आहे. पण ही एक दीर्घ प्रक्रिया आहे आणि जर त्या प्रक्रियेसाठी पायाभरणीस असलेली धोरणं सुरुवातीला नसतील तर पुढच्या आधुनिक टप्प्यांचा तर विचारच

करायला नको. अशी पायाभरणी करण्याचं द्रष्टेपण यशवंतरावांनी दाखवलं. त्यामुळेच कृषी, कृषीआधारित उद्योग आणि उद्योग यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय महत्वाचे मानावे लागतील.महाराष्ट्रातलं राजकारण हे सहकाराचं राजकारण म्हटलं जातं. कारण सहकारी चळवळीची, त्यातून उभारल्या गेलेल्या अर्थव्यवस्थेची एक परंपराच महाराष्ट्रात आजही आहे.

यशवंतरावांच्या अगोदरच प्रवरासारखे असतील वा अन्य सहकारी तत्वावरचे प्रयोग महाराष्ट्रात यशस्वी झाले होते. पण यशवंतरावांनी या प्रयोगांना कायद्याचे आणि संस्थात्मक बळ दिले. ठरवून काही धोरणं निश्चित केली. त्या धोरणांमुळेच राज्याच सहकारी औद्योगिक वसाहती तयार झाल्या. साखर कारखाने, दूध संघ, कुक्कुटपालन, पतपेढ्या असं एक जाळं कालानुरुप तयार होतं गेलं. केवळ शेती असं स्वरुप राहता ती उद्योगांची माळ बनली. सहकारी कायद्यानं त्यात लोकशाही पद्धतीही आणली आणि म्हणूनच पंचायत राज्य पद्धतीमधून जसं नवं स्थानिक नेतृत्व तयार होतं, तसंच ते सहकारी उद्योगांच्या पद्धतीतूनही तयार होऊ लागलं. यशवंतरावांच्या मोजक्या काळात अठरा नवे साखर कारखाने सुरु झाले.

शेतीच्या बाबतीतला एक महत्वा निर्णय, धोरण आणि ते राबवण्याबाबत यशवंतरावांचं अजून एक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात कुळकायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि १९६१ सालचा कमाल जमीन अधिग्रहण कायदा. त्यामुळे कृषीअर्थव्यवस्थेत सर्व वर्गांकडे जमिनीचं वाटप झालं. बहुतांश समाज या व्यवस्थेशी जोडला गेला. बिहार वा अन्य राज्यांमध्ये आजही जमिनीचं समान वाटप नसल्याने काय आर्थिक आणि सामाजिक प्रश्न उद्भवले ते पाहता, महाराष्ट्रासाठी हे धोरणं कसं महत्वाचं ठरलं याचा अंदाज लावता येतो. औद्योगिकीकरणात आज आघाडी घेणा-या महाराष्ट्रानं यशवतंरावांनी त्यांच्या काळात घेतलेल्या धोरणांबाबत जागृत असणं आवश्यक आहे. आज क्ष्त्र सिटी वा च्क्ष्ढ च्या काळात असणाया या पिढीनं लक्षात घ्यायला हवं की ग्क्ष्क्क वा औद्योगिक वसाहतींची संकल्पना चव्हाण यांनी आणली.

अरुण साधू त्यांच्या लेखात लिहितात, 'चव्हाणांनी राज्यभर औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची सर्वंकष योजना स्वीकारली, ज्यायोगे शहरांपासून दूर ग्रामीण भागातदेखील छोटे कारखाने निघून तेथील रोजगार वाढेल. मूळ कल्पना नेहरुंनी १९४७ मध्ये स्थापन केलेल्या ॲडव्हायजरी प्लानिंग बोर्डाची. त्यांनी १९५५ मध्ये प्रांतांना औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची शिफारस केली. तेव्हा मुख्यमंत्री चव्हाणांचे द्वैभाषिक त्यात आघाडीवर होते. महाराष्ट्र राज्य झाल्यावर त्या योजनेत सुधारणा करुन तिचा वेगानं विस्तार केला. मुंबईजवळ ठाणे, पुण्याच्या आसपास आणि कोल्हापूरजवळ शासकीय प्रयत्नानं अशा वसाहती निर्मिल्या गेल्या आणि त्यांना योजनेप्रमाणे पुष्कळ सोयी-सवलती मिळाल्या. पुण्याजवळ भोसरी इथे औद्योगिक वसाहत उभारायची होती तेव्हा चव्हाणांनी स्वतः जाऊन वसाहतीसाठी जागा निवडली.'

### शिक्षणक्षेत्रातले अमूलाग्र निर्णय

नव्या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शिक्षणक्षेत्रात यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेले काही निर्णयही दूरगामी परिणाम करणारे ठरले. ते कसे, याचा अंदाज या निर्णयांकडे बघितल्यावरच आपल्याला येईल. सगळ्यात महत्वाचा म्हणजे नवी विद्यापीठं स्थापन करायचा निर्णय. तेव्हा मुंबई-पुण्यासारखी मोजकी विद्यापीठं महाराष्ट्रात होती. शिक्षण सर्वदूर न्यायचं असेल, नवी पिढी घडवायची असेल तर नवी विद्यापीठं हवीत. पण तेव्हा विद्यापीठ एखाद्या भागाला मिळण्यासाठी अनेक अटी होत्या.मुख्य म्हणजे त्या भागात काही संख्येनं महाविद्यालयं असणं आवश्यक होतं. पण मराठवाड्यासारख्या भागात तेव्हा मोजण्याइतपतच महाविद्यालयं होती आणि परिणामी विद्यापीठ नव्हते. पण यशवंतरावांनी तो निर्णय बदलला आणि मराठवाड्यात औरंगाबादमध्ये विद्यापीठ स्थापन केलं. ते आज डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ म्हणून ओळखलं जातं. असंच विद्यापीठ त्यांनी कोल्हापूरातही छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावानं स्थापन केलं. या दोन्ही विद्यापीठांमुळं या विभागांमध्ये शिक्षणक्षेत्रात कसे बदल झाले हे आज डोळ्यांना स्पष्ट दिसतं.

आजही महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत मिळते. 'क्ष्एक'साठी ही सवलत यशवंतरावांनी सुरु केली. तेव्हा १२०० रुपये आर्थिक उत्पन्न वा त्यापेक्षा कमी असलेल्या पालकांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलं होतं. कालानुरुप ही रक्कम बदलत गेली. पण त्यामुळे अनेकजण मुख्य शैक्षणिक प्रवाहात आले.

आपल्या 'यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य' या लेखात डॉ. ज. रा. दाभोळे लिहितात, 'यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात दूरगामी पावलं टाकली. याचे एक उदाहरण म्हणजे सातारा इथे सैनिक स्कूलची केलेली स्थापना हे होय. सातारा जिल्ह्यातील काही गावांमधून सैन्यात भरती होण्याचे प्रमाण आजही मोठे असल्याचे दिसून येईल. त्याऐवजी सैनिक स्कूलमध्येच प्राथमिक स्वरुपाचे शिक्षण उपलब्ध झाल्यास सैन्यामध्ये अधिकारी पदावर पोहोचणे शक्य होईल. म्हणून सातारा येथील सैनिक स्कूलमध्ये नैशनल डिफेन्स अकदमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय त्यांनी उपलब्ध करुन दिली.' त्यांच्या अजून एक महत्वाचा निर्णय मानला जातो तो म्हणजे कायद्यानं नवबौद्धांना सवलती मिळवून देणं. डॉ आंबेडकरांसोबत धर्मांतर केलेल्या अनेकांना पूर्वी मिळत असलेल्या सवलती सरकारनं बंद केल्या होत्या. पण त्यानं शैक्षणिक वा सामाजिक मागासलेपण कमी होणार नव्हतं. म्हणून यशवंतरावांनी निर्णय घेऊन नवबौद्धांनाही सवलती मिळतील हे पाहिलं.

**साहित्य, संस्कृती आणि भाषावृद्धी**

यशवंतरावांचे साहित्य आणि सांस्कृतिक वर्तुळाशी असलेले घनिष्ठ संबंध सवर्श्रुत आहेत. ते स्वतः राजकारणाच्या व्यस्ततेतून लेखन करत. त्यामुळे याच तळमळीतून त्यांनी घेतलेले काही निर्णय महत्वाची नोंद ठरावेत. त्यांनी 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ची स्थापना केली. या मंडळानं केलेली प्रकाशनं, राबवलेले उपक्रम बहुविध आहेत. सर्वात महत्वाचं म्हणजे त्यांनी 'मराठी विश्वकोष मंडळा'ची निर्मिती केली आणि त्याचे मुख्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. मराठी विश्वकोषाचं खूप मोठं काम इथं झालं. यशवंतरावांनी भाषा संचालनालयाचीही स्थापना केली. नाट्य चित्रपट कलाकारांसाठी योजना सुरु केल्या.एखाद्या नेत्याचं मोठेपण हे त्यानं घेतलेल्या निर्णयांसोबत त्या निर्णयचं काळाच्या कसोटीवर लकाकून उठणं यावरही ठरतं. जर ते निर्णय कालौघात फिके पडत जाणार असतील तर नेतृत्वही विस्मृतीत जातं. यशवंतरावां उल्लेखाशिवाय न होणारं महाराष्ट्राचे आजचे राजकीय-आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक व्यवहार, त्यांच्या निर्णयांचं मोठेपण दर्शवितात. त्यातल्या निवडक महत्वाच्या निर्णयांची ही नोंद.

**यशवंतराव चव्हाण : शेतीचे महत्त्व अधोरेखित करणारा नेता**

दिल्लीत चालू असलेल्या शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, आज राजकीय नेतृत्व, शेती आणि शेतीच्या प्रश्नाकडे किती गांभीर्याने बघत आहे? माजी उपपंतप्रधान दिवंगत यशवंतराव दिवसेंदिवस शेती आणि शेतीसंबंधीचे प्रश्न अधिक गंभीर होत चाललेले आहेत. गेल्या दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून दिल्ली येथे केंद्र शासनाने मंजूर केलेल्या शेती कायद्यांविषयी शेतकऱ्यांचे ऐतिहासिक आंदोलन चालू आहे. या प्रश्नावर सरकार किती गंभीर आहे? हे सर्व जग उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शेती आणि शेती व्यवसायाकडे एक राजकीय नेता म्हणून यशवंतराव चव्हाण कसे बघत होते. त्यांचा शेतीविषयक काय दृष्टिकोन होता, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. 'सर्वांगीण विकास' हा यशवंतराव यांचा परवलीचा शब्द होता. एका क्षेत्रामध्ये प्रगती झाली म्हणजे विकास होतो असे ते मानत नसत. सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती म्हणजे विकास अशी विकासाची ते व्याख्या करत. शेतीचा प्रश्न हा या देशातील मूलभूत असा प्रश्न आहे आणि तो सर्व जगालाही भेडसावतो आहे. इतर क्षेत्रातील उत्पादन आणि शेतीमधील उत्पादन या मध्ये मूलभूत असा फरक आहे. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन हे केंद्रभूत स्वरूपाचे तर, शेतीचे उत्पादन हे विकेंद्रित स्वरूपाचे असल्यामुळे त्यांच्या उत्पादनाच्या आघाडीवर सतत लढाई चालू ठेवावी लागते.

कोणत्याही प्रश्नांचा विचार करताना यशवंतराव अतिशय गांभीर्यपूर्वक आणि दूरदृष्टीने विचार करत असत. शेतीच्या प्रश्नांविषयी ते म्हणत असत की, शेतीचा प्रश्न हा रावणासारखा आहे. राम आणि रावणाच्या कथेतील रावण हा दहा तोंडाचा होता तर, आमच्या शेतीचा प्रश्न हा शंभर तोंडाचा आहे. जेथे पाहावे तेथे त्याला तोंड आहे. शेतीची रचना कशी असावी, शेतीची धारणा कशी असावी, शेतीमध्ये ज्या अवजारांचा उपयोग करावयाचा आहे त्याचे स्वरूप कसे असावे, शेतीला लागणारे भांडवल कोणत्या पद्धतीने घ्यावे, शेतीचा उपयोग कोणत्या कामासाठी करावा, शेतीवर आधारलेल्या धंद्यांचा उपयोग कसा करावा, त्याची बाजारपेठ कशी हस्तगत करावी असे शेती संबंधीचे हजारो प्रश्न आहेत, असे त्यांचे मत होते.

शेती आणि शिक्षणाचा, प्रशिक्षणाचा संबंध आम्ही तोडून टाकलेला आहे. शेतकयाला शिक्षणाची नितांत गरज आहे असे आजही आपण मानत नाही. आमची कृषी विद्यापीठे शेतकऱ्याच्या बांधावर जायला कमी पडतात याचाही फेरविचार करण्याची वेळ आली आहे. शेतकरी आणि शेती संबंधित असणारा मनुष्य हा शहाणा झाल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही असे त्यांचे मत होते. कोणतेही शास्त्र स्थिर नाही त्यात काळानुसार बदल होत असतात. जगातील ज्ञान वाढते आहे या वाढत्या ज्ञानाचा परिणाम शेतीच्या ज्ञानावर आणि विज्ञानावर होत आहे. म्हणून शास्त्रीय ज्ञानाची गरज इतर क्षेत्राबरोबरच शेतीला अधिक आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करण्याचे दिवस कधीच संपलेले आहेत या देशातील जास्तीत जास्त लोकांना शेतीमध्येच काम करावयाचे आहे. दोन एकरात शेतीचे काम करणारा शेतकरी आपल्या कामामध्ये पराभूत झाला तर, तो देशाचा पराभव होतो असे त्यांचे मत होते.

शेतीसंबंधीचा नवा दृष्टिकोन, शास्त्रीय दृष्टिकोन हा मर्यादित राहता कामा नये. पाच पंधरा कापड गिरण्या काम करू लागल्या की, काही कोटी लोकांना कापड मिळते, पण पाच-पंचवीस ठिकाणीच शेतीचे चांगले उत्पादन काढण्याचा प्रयोग केला तर, त्यामुळे शेतीचे एकंदरीत उत्पादन वाढण्याचा काही संबंध नाही. दहा पाच कृषीपंडित निघाले तर, त्यांचा वैयक्तिक मोठेपणा वाढेल पण त्यांची शेती करण्याची पद्धत हजारो शेतकऱ्यांपर्यंत पाझरत गेली नाही तर, त्यांच्या ज्ञानाचा काही उपयोग नाही. म्हणून शेतीचे ज्ञान पावसाच्या पाण्यासारखे सर्वत्र गेले पाहिजे. वाहणारी नदी ज्या गावच्या काठाने जाते त्या त्या गावालाच फक्त पाणी मिळते पण पावसाचे पाणी हे सगळीकडे जाते म्हणून पावसाच्या पाण्यासारखे शेतीचे ज्ञान सगळीकडे पसरले पाहिजे, वाढले पाहिजे आणि विविध महाविद्यालयात त्याची केंद्रे झाली पाहिजेत असा आणि एवढा व्यापक विचार ते करीत असत.

**समारोप :-**

मा.यशवंतरावांनी कृषी, सहाकाराला चालना दिली. त्याचबरोबर त्यांनी दुष्काळ निवारणाचे विचार सद्यःकालीन परिस्थितीतही उपयुक्त वाटतात आजही महाराष्ट्रातील ठराविक प्रदेशात वांरवार दुष्काळी परिस्थिती निर्माण होताना दिसते त्यावर तात्पुरत्या उपाययोजना

केल्या जातात. चारा छावण्या, चारा डेपो व टॅकरने पाणी पुरवठा करुन हा प्रश्न सुटणार नाही या प्रश्नाची कायमची सोडणूक होण्यासाठी यशवंतरावांनी सांगितलेल्या उपाययोजना आमलात आणणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दाखविलेली दूरदृष्टी आणि घेतलेले अचूक निर्णय यातूनच आजचा प्रगतशील महाराष्ट्र घडला आहे.

आपल्या 'देशाच्या आर्थिक प्रगतीचे नेतृत्व करणारे नेते' या लेखामध्ये डॉ. जे. एफ. पाटील म्हणतात, 'सहकारी अर्थकारण ही यशवंतराव चव्हाण यांची विकासाच्या अर्थशास्त्राला एकमेवाद्वितीय देणगी आहे. त्यांनी महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मध्ये मंजूर केला. राज्यभर जिल्हा केंद्रात सहकारी प्रशिक्षण केंद्रे उभी केली. सहकारी संस्थांना सरकारी भांडवल आणि मार्गदर्शन देण्याची व्यवस्था केली. सहकारी पत, सहकारी पणन, सहकारी वाहतूक, सहकारी ग्राहक भांडारे, सहकारी श्रमिक संस्था, तसेच सहकारी खरेदी-विक्री संघ असा एक सर्वस्पर्शी ग्रामीण विकासाचा वादळवारा तयार करण्यात यशवंतराव यशस्वी झाले.'

शेतीचे महत्व अधोरेखित करताना ते म्हणतात, कोणत्याही राष्ट्राने कितीही प्रगती केली तरी शेवटी त्याचे पाय जमिनीवरच असतात. चंद्रावर जाण्याचा प्रयत्न करावयाचा असला तरीही त्याच्यासाठी जमिनीवर जर पाय नसतील तर, चंद्राकडे जाण्याचा विचार करणे सुचणार नाही. चंद्रावर जाणारे रॉकेट कसे तयार करावे याचा विचार शास्त्रज्ञाच्या डोक्यात चालवायचा असेल तर, त्याच्या पोटामध्ये प्रथम अन्नाचा कण गेला पाहिजे. त्याशिवाय ते काम त्याला जमणार नाही. त्यामुळे कितीही मोठे प्रयत्न करायचे एखाद्या देशाने ठरवले तरी, जमिनीतून निर्माण होणाऱ्या उत्पादनावरच शेवटी माणूस अवलंबून असतो.

## सदंर्भसूची

१. आर. डी. प्रधान; माधव गोडबोले (१९९९). पुनरूज्जीवनाचा पराभवः चव्हाण संरक्षण मंत्री,

२. जाधव, व्ही., २००६. उच्चभ्रू राजकारण आणि महाराष्ट्राची रोजगार हमी योजना.

३. सिरसीकर, व्ही.एम. (१९९९). कुलकर्णी, ए.आर.; वागळे, एन.के. (ड्ड्ड्ढ्ढ.). राज्य हस्तक्षेप आणि लोकप्रिय प्रतिसादः एकोणिसाव्या शतकात पश्चिम भारत. मुंबई :

४. 'उद्घाटन वाय.बी. चव्हाण स्मृती व्याख्यान'. ८ डिसेंबर २०१२ रोजी पुनर्प्राप्त.

५. 'कुलगुरूंच्या संक्षिप्त सारांश'. ५ ऑक्टोबर २०२१ रोजी पुनर्प्राप्त. 'महाराष्ट्रातील विद्यापीठे'.

६. ऑक्टोबर २०२१ रोजी पुनर्प्राप्त. 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९' . महाराष्ट्र शासन.